**आदरातिथ्य क्षेत्रास औद्योगिक दर्जा देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : टीडीएस २०२०/९/प्र.क्र. ५०२/पर्यटन,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक:- ०३ डिसेंबर, २०२०.

**संदर्भ :-** गृह विभाग, शासन निर्णय क्र.एमटीसी -०३९९/प्र.क्र.२०१/पर्यटन, दि.७/४/१९९९.

**प्रस्तावना :**

आदरातिथ्य क्षेत्र हा पर्यटन व्यवसायातील मुख्य सेवा उद्योग आहे आणि महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. याद्वारे मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होते. तसेच हा व्यवसाय राज्याला परकीय चलन मिळवून देण्याचे एक परिणामकारक साधन आहे. कोविड-१९ च्या नंतर राज्याची आर्थिक स्थिती पूर्वपदावर येण्यास या क्षेत्राचा निश्चितच मोठा हातभार लागणार आहे. मात्र कोविड-१९ मुळे सद्यस्थितीत या क्षेत्रावर अत्यंत प्रतिकुल परिणाम झाला असून अंदाजे २.८ लाख इतकी रोजगार हानी झाली आहे.

२. राज्यात पर्यटन व्यवसायाची नियोजनबध्द व योग्य वाढ साध्य करण्यासाठी व राज्यात उच्चतम पर्यटन साधन संपत्ती असलेल्या क्षेत्रांचा अग्रक्रमाने, जलदगतीने विकास होण्याच्या दृष्टीने उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी गृह विभाग, शासन निर्णय क्र. एमटीसी ०३९९/ प्र.क्र.२०१/पर्यटन, दि. ०७ एप्रिल, १९९९ अन्वये राज्यातील पर्यटन व्यवसायांतर्गत काही पर्यटन घटकांना उद्योगाचा दर्जा देण्यात आला आहे. परंतू काही कारणास्तव त्याची अंमलबजावणी झाली नाही.

३. प्रतिवर्षी ८.५% दराने वाढ होण्याची तसेच राज्याच्या सकल उत्पन्नात अंदाजे ५५ बिलियन डॉलर्स इतकी वाढ होण्याची क्षमता पर्यटन क्षेत्रामध्ये आहे. त्याचबरोबर या क्षेत्रामध्ये सन २०३० पर्यंत ६० लाख नवीन रोजगार निर्मिती होऊ शकते. आदरातिथ्य क्षेत्र हे पर्यटन व्यवसायाचे सर्वात महत्वाचे अंग आहे. कोविड-१९ मुळे क्षेत्रावर विपरित परिणाम झाला असून पर्यटन या क्षेत्रास पुनरुज्जीवित करण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे. त्यादृष्टीने पहिल्या टप्प्यात केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून दि.१ एप्रिल, २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणी पट्टी , मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्याची बाब शासनच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

१) केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत असलेल्या हॉटेल व्यावसायिकांकडून दि.१ एप्रिल, २०२१ पासून वीज दर, वीज शुल्क, पाणी पट्टी, मालमत्ता कर, विकास कर, वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक व अकृषिक कराची आकारणी औद्योगिक दराने करण्यात यावी.

२) केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे नोंदणीकृत नसलेल्या हॉटेल व्यावसायिकांनी किमान मुलभूत दर्जा (Basic Minimum Standards) प्राप्त करण्यासाठी विहित निकषांची पूर्तता केल्यानंतर औद्योगिक दराने कर / शुल्क आकारणी करण्यात यावी. त्याकरीता एक तज्ञ समिती नेमून राज्याचे निकष निश्चित करण्याची कार्यवाही दोन महिन्यात पूर्ण करण्यात यावी.

३) त्यानंतर ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबवून निकषांची पूर्तता करणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांना औद्योगिक दराने कर / शुल्क आकारणी लागू करण्यात यावी.

४) हा शासन निर्णय, मंत्रीमंडळाच्या दिनांक ५.११.२०२० रोजी झालेल्या बैठकीस दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

५) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक २०२०१२०४१७११५९६६२३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Valsa R. Nair Singh

Digitally signed by Valsa R. Nair Singh
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=ALL INDIA SERVICES, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3d247d5da6bcbfdaa11e2c5849d798d7a4166b9383caae837665a4e85bf1dfb6, serialNumber=6b5f579e0e797ec0d52aa18f6730b8fbe3915a18f04069b941500b4f1ec297cc, cn=Valsa R. Nair Singh
Date: 2020.12.04 17:18:11 +05'30'

**( वल्सा नायर-सिंह )**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन,मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव , मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री(पर्यटन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (पर्यटन) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
७. मा. सर्व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय, मुंबई.
८. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.

९. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.

१०. मा. सर्व विधानपरिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई

११. मा. सर्व विधानसभा सदस्य, विधानमंडळ, मुंबई

१२. महालेखापाल, महाराष्ट्र - १, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), मुंबई

१३. महालेखापाल, महाराष्ट्र - २, (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), नागपूर

१४. महालेखापाल, (स्थानिक निकाय लेखापरीक्षा व लेखा), मुंबई.

१५. सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१६. संचालक, पर्यटन संचालनालय, महाराष्ट्र राज्य

१७. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

१८. सर्व विभागीय आयुक्त.

१९. सर्व जिल्हाधिकारी.

२०. सर्व महानगरपालिका आयुक्त.

२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

२२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.

२३. निवड नस्ती, कार्यासन-पर्यटन.

****